Literacy for a Billion

Movie: Bala Gau Kashi Angai
Year: 1977

Song: Dhundit Gau Mastit Rahu
Lyricist: Jagdish Khebudkar

ओ....
ओ....
ओ.... आ...
धुंदीत गाऊ मस्तीत राहू
छेडीत जाऊ आज प्रीत साजना
हो... थंडी गुलाबी
हवा ही शराबी
छेडीत जाऊ आज प्रीत साजनी

हो... धुंदीत गाऊ मस्तीत राहू
छेडीत जाऊ आज प्रीत साजना
हो... थंडी गुलाबी
हवा ही शराबी
छेडीत जाऊ आज प्रीत साजनी

हो... धुंदीत गाऊ ऊ... ऊ...

रूपेरी उन्हात धुके दाटलेले
रूपेरी उन्हात धुके दाटलेले
दूधी चांदणे हे जणू गोठलेले
रूपेरी उन्हात धुके दाटलेले
दूधी चांदणे हे जणू गोठलेले
असा हात हाती
तू एक साथी
जुळे आज ओठी
माझ्या गीत साजना
हो... धुंदीत गाऊ मस्तीत राहू
छेडीत जाऊ आज प्रीत साजना
हो... धुंदीत गाऊ ऊ... ऊ...

दवांने भिजावी इथे झाड वेली
राणी फुलांची फुलांनीच न्हाली
ल ल ल ला
ल ल ला
दवांने भिजावी इथे झाड वेली
राणी फुलांची फुलांनीच न्हाली
ये ना जराशी प्रिये बाहूपाशी
अशी मिलनाची आहे
रीत साजनी
हो... थंडी गुलाबी
हवा ही शराबी
छेडीत जाऊ आज प्रीत साजनी

हो... धुंदीत गाऊ ऊ... ऊ...

अशी हिरवळीची शाल पांघरावी
अशी हिरवळीची शाल पांघरावी
लाली फळांची गाली चढावी
अशी हिरवळीची शाल पांघरावी
लाली फळांची गाली चढावी
हळूहळू वारा झणकारी तारा
आळवीत प्रीतीचे संगीत साजना
हो... धुंदीत गाऊ मस्तीत राहू
छेडीत जाऊ आज प्रीत साजना
हो... धुंदीत गाऊ ऊ... ऊ...

जळी यौवनांचा डूले हा शिकारा
असा हा निवारा
असा हा उबारा

जळी यौवनांचा डूले हा शिकारा
असा हा निवारा
असा हा उबारा
अशा रम्यकाळी
नशा आज आली
एकांत झाला जणू आज पाहुणा

हो... धुंदीत गाऊ मस्तीत राहू
छेडीत जाऊ आज प्रीत साजना
हो... थंडी गुलाबी
हवा ही शराबी
छेडीत जाऊ आज प्रीत साजनी
हो... धुंदीत गाऊ ऊ... ऊ...

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*